

# 'मेक इन इंडिया'नुसार मेट्रो ३ डबे

**कुलाबा वांद्रे सीप्झ मेट्रो -३ मार्गिकेसाठी आठ डब्यांच्या एकूण ३१ गाड्यांची निर्मिती मेक इन इंडियाच्या धोरणानुसारच होणार आहे. ॲलस्टॉम या कंत्राटदाराद्वारे श्री सिटी, आंध्र प्रदेश येथील कारखान्यात डब्यांची बांधणी होणार आहे. मेट्रो-३ ही विना चालक असेल.**

## ॲक्वा लाइन

शुक्रवारी मेट्रो-३च्या डब्यांच्या प्रतिकृतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण झाले. मेट्रो-३ या संपूर्णतः भूमिगत मेट्रो मार्गिकेला ॲक्वा लाइन असे संबोधले जाणार आहे. या डब्यांची रंगसंगती तसेच डब्यांची आंतर-बाह्य संरचना हा नावाला सुयोग्य अशी करण्यात येणार आहे.



## पहिली गाडी वर्षभरात

मेट्रो-३ डब्यांच्या निर्मितीस नोव्हेंबर २०१९ पासून सुरुवात होणार असून पहिली गाडी एका वर्षाच्या आत मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.




## असे असतील मेट्रो-3चे डबे

- सुरक्षित आरामदायी प्रवास
- संपूर्णतः वातानुकूलित व आर्द्रता नियंत्रण यंत्रणा
- प्रवाशांच्या मनोरंजनासाठी एलसीडीचा वापर
- मार्गिकेचा डिजिटल नकाशा
- सुंदर बैठक व्यवस्था
- दिव्यांग प्रवाशाच्या सोयीसाठी व्हील चेअर
- सुरक्षेसाठी प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही
- डब्यात अग्निशमन, धूर व अग्निशोधक यंत्रणा
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व ट्रेन नियंत्रक यांच्यातील संवादासाठी ध्वनी संवाद (voice communication)यंत्रणा

